दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा — कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले ✻ अंक : ४४ ✻ जालना ✻ ✻ सोमवार १४ सप्टेंबर २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻

# महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट ; पावसासाठी गणरायाला आमदार लोणीकरांचे साकडे

## शेतकऱ्यांच्या पिकांना पुन्हा जीवनदान मिळावे, बळीराजा सुखी-समाधानी व्हावा; गणेश मंडळांनी धार्मिक भावना जपत उत्सव साजरा करण्याचे आवाहन

परतूर : महाराष्ट्रावर दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले असून, पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. खरीप हंगामातील पिकांना पावसाअभावी मोठा फटका बसत असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस पडावा, कोरड्या पडलेल्या शेतांना पुन्हा पाण्याची ओल मिळावी आणि शेतकऱ्यांच्या पिकांना नवसंजीवनी मिळावी, यासाठी भाजपा नेते, माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी गणरायाला साकडे घातले. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला शेतकऱ्यांच्या गंभीर परिस्थितीचा उल्लेख करत आमदार लोणीकर यांनी, महाराष्ट्रातील बळीराजावर आलेले संकट दूर व्हावे, राज्यात सर्वदूर चांगला पाऊस पडावा, शेतकऱ्यांच्या पिकांना जीवन मिळावे आणि प्रत्येक शेतकरी सुखी व समाधानी व्हावा, अशी प्रार्थना गणरायाच्या चरणी केली.

गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने मोठी विश्रांती घेतल्याने अनेक भागांतील खरीप पिके पाण्याअभावी धोक्यात आली आहेत. सोयाबीन, कापूस यासह विविध पिकांवर पावसाच्या खंडाचा विपरीत परिणाम होत असून, शेतकऱ्यांच्या चिंतेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे यंदाचा गणेशोत्सव हा केवळ उत्सवाचा न राहता बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्याचा उत्सव ठरावा, अशी भावना आमदार लोणीकर यांनी व्यक्त केली. धार्मिक भावना जपत गणेशोत्सव साजरा करा दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आमदार बबनराव लोणीकर यांनी राज्यातील गणेश मंडळे, कार्यकर्ते आणि नागरिकांना गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि धार्मिक भावना जपत साजरा करण्याचे आवाहन केले आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरेचा अविभाज्य भाग असून, या उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक बांधिलकी अधिक मजबूत व्हावी. गणेश मंडळांनी सामाजिक उपक्रम,



प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच शेतकरी आणि समाजाच्या हिताचे उपक्रम राबवावेत, असे आवाहनही लोणीकर यांनी केले. विघ्नहर्त्या गणरायाने महाराष्ट्रातील दुष्काळाचे संकट दूर करावे, वरुणराजाची कृपा व्हावी आणि बळीराजाच्या शेतात पुन्हा हिरवाई नांदावी, अशी मनोकामना आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली.

# ६० वर्षीय वृद्धाकडून ६ वर्षीय मुलीवर अत्याचाराचा प्रयत्न

## आरोपी पोलिसांच्या ताब्यात, संतप्त जमावाने पाडले आरोपीचे घर

जालना/प्रतिनिधी: माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत धक्कादायक घटना जालना शहरातून समोर आली आहे. केवळ सहा वर्षाच्या कोवळ्या कळीला ६० वर्षाच्या इसमाकडून चुरगळण्याचा प्रयत्न झाल्याची तक्रार सदर बाजार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. नरसापूर प्रकरणाची आठवण करून देणारी घटना जालना शहरात घडल्याने खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की,दिनांक १२ सप्टेंबर शनिवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास जालना शहरातील रामनगर परिसरातील विणकर मोहल्ला येथील एका सहा वर्षाच्या चिमुरडीला चॉकलेट चे आमिष दाखवून तब्बल ६० वर्षाच्या नराधमाने वासनेचा शिकार बनविण्याचा प्रयत्न केला. दिनेश काशीनाथ सुवर्णकार असं नराधमाचे नाव असून त्याला सदर बाजार पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

मात्र, केवळ सहा वर्षाच्या मुलीवर साठ वर्षीय आरोपीने अत्याचाराचा प्रयत्न केल्याने नागरिक संतप्त आल्याचे पाहायला मिळाले. संतप्त नागरिकांनी आरोपीचे घर जमीनदोस्त केले आहे. माजी आमदार कैलास गोरट्याल यांनी या प्रकरणी आक्रमक भूमिका घेत पोलीस ठाण्यास घेराव घातला तसेच आरोपीला आमच्या ताब्यात देण्याची मागणी केली.

दरम्यान, जालना शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा एकदा दिसून येत आहेत. शहरात वारंवार होणारे खून, लूटमार, अवैध धंदे यामुळे त्रस्त असलेल्या शहरातील नागरिकांनी २१ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याची नियोजन केलेले असतानाच ही घटना समोर आली आहे. त्यामुळे २१ सप्टेंबरच्या आंदोलनात जालना शहरातील नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आधीच वारंवार होत असलेल्या खुनाच्या घटनांमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असतानाच आता महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा देखील ऐरणीवर आला आहे. जालना शहरात केवळ महिलाच नव्हे तर लहान बालके देखील सुरक्षित नसल्याची प्रचीती या घटनांमधून येत आहे.त्यामुळे आगामी सन उत्सवाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्याचे आव्हान जालना पोलिसांपुढे असणार आहे.

जालना शहरात केवळ महिलाच नव्हे तर लहान बालके देखील सुरक्षित नसल्याची प्रचीती या घटनांमधून येत आहे.त्यामुळे आगामी सन उत्सवाच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था कायम राखण्याचे आव्हान जालना पोलिसांपुढे असणार आहे.



# जालना जिल्ह्यात अवैध वाहतूक व दारुविक्री विरोधात धडक कारवाई

जालना/प्रतिनिधी : जिल्ह्यात अवैध गौण खनिज वाहतूक तसेच अवैध दारूविक्रीविरोधात जिल्हा प्रशासनाने धडक कारवाई केली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली महसूल, प्रादेशिक परिवहन विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकांनी दि.१२ रोजी ही कारवाई केली. या कारवाईत अवैध गौण खनिज वाहतूक करणारा एक हायवा वाहन जप्त करण्यात आला असून, आरटीओ विभागाने विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करत सुमारे १ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाने अवैध देशी-विदेशी दारूचा साठा जप्त करून दोन गुन्हे दाखल केले आहेत. महसूल विभागाच्या पथकाने अंबड तालुक्यातील धनगरपिंपरी रस्ता परिसरात अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या हायवा ट्रक (क्रमांक एमएच-२०-ईजी-८००१) वर कारवाई केली. सदर वाहनातून गौण खनिजाची अवैध वाहतूक होत असल्याचे आढळून आल्यानंतर वाहन जप्त करून पुढील कारवाईसाठी ताब्यात घेण्यात आले. प्रादेशिक परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अंबड-वडीगोद्री आणि अंबड-धुळे मार्गावर वाहनांची तपासणी केली. या तपासणीत एकूण ११५ वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये ओव्हरलोड वाहने, फिटनेस प्रमाणपत्रासंबंधी त्रुटी, विमा प्रमाणपत्र नसणे तसेच रिफ्लेक्टर नसणे अशा विविध वाहतूक नियमांच्या उल्लंघनांची प्रकरणे आढळली. या कारवाईत जागेवर १ लाख २० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच प्रलंबित ई-चलानच्या माध्यमातूनही दंडाची वसुली करण्यात आली.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने अंबड तालुक्यात अवैध देशी व विदेशी दारू विक्री तसेच साठवणुकीविरोधात कारवाई केली. या कारवाईत दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण ९ लिटर दारूसाठा जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची किंमत ७ हजार ०६० रुपये असल्याची नोंद करण्यात आली आहे. अंबड येथील हॉटेल सावली येथे अवैध ५.७६ लिटर देशी दारू साठ्यावर कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणी सी. आर. क्रमांक २०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच अंबड तालुक्यातील शहागड येथील हॉटेल कुबा येथे ३.२४ लिटर देशी-विदेशी दारूच्या अवैध साठ्यावर कारवाई करून सी.आर. क्रमांक ३३१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलिस दलाकडूनही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (इछ्ड्ड) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा व चझऊ- अधिनियमातील संबंधित कलमांनुसार प्रतिबंधात्मक कारवाईची नोंद करण्यात आल्याचे जालना जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# समृद्धी दाभाडेचा क्रिकेट क्षेत्रात दमदार प्रवास धोपटेश्वरच्या लेकीची जिद्द; जिल्हा यू-१५ महिला क्रिकेट संघात स्थान

**नवनाथ गव्हाणे**
**बदनापूर / प्रतिनिधी**

जिद्द, कठोर परिश्रम आणि क्रिकेटप्रती असलेल्या अथांग प्रेमाच्या जोरावर धोपटेश्वर येथील १४ वर्षीय समृद्धी गजानन दाभाडे हिने जालना जिल्हा १५ वर्षांखालील (यू-१५) महिला क्रिकेट संघात स्थान मिळवून नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. गल्ली क्रिकेटपासून सुरू झालेला तिचा क्रिकेट प्रवास आता जिल्हा पातळीपर्यंत पोहोचला असून, साई कोने क्रिकेट अकॅडमी, जालना येथे सातत्यपूर्ण सरावामुळे ती एक उत्कृष्ट अष्टपैलू महिला क्रिकेटपटू म्हणून पुढे येत



आहे. समृद्धीला क्रिकेटची आवड लहानपणापासूनच आहे. क्रिकेटच्या सरावासाठी तिला दररोज गावातून जालना येथे सुमारे ६० किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. शाळा, अभ्यास आणि क्रिकेटचा सराव असा दिनक्रम सांभाळत ती आपल्या ध्येयाकडे वाटचाल करत आहे.

समृद्धी ही उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू असून उजव्या हाताने फलंदाजी तसेच उजव्या हाताने गोलंदाजी करते. फलंदाजी करताना धावा करण्यासोबतच गोलंदाज म्हणूनही प्रभावी कामगिरी करण्याची तिची क्षमता आहे. तिच्या या मेहनतीला आता जिल्हास्तरीय निवडीच्या रूपाने यश मिळाले आहे. तिच्या दैनंदिन दिनक्रमात सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत शाळा व अभ्यास, त्यानंतर सायंकाळी ४.३० ते ६.३० वाजेपर्यंत शाळेचा अभ्यास, तर सायंकाळी ७ ते रात्री १० वाजेपर्यंत साई कोने क्रिकेट अकॅडमी येथे क्रिकेटचा कसून सराव असतो. शाळा,

# जालन्यात बळीराजाची व्यथा पुन्हा ऐरणीवर

जालना : गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर पुन्हा एकदा गंभीर संकट उभे राहिले आहे. ऐन वाढीच्या काळात पावसाने पाठ फिरवल्याने सोयाबीन आणि कपाशीची पिके सुकून वाळू लागली आहेत. पिके हातातून गेल्याचे स्पष्ट झाल्याने पारेगाव तांडा येथील शेतकरी रमेश सिताराम जाधव यांनी आपल्या तीन एकर शेतातील उभे सोयाबीन पीक उपटून फेकून दिले. एवढेच नव्हे, तर सुकलेल्या पिकांमध्ये शेळ्या आणि बैल चरण्यासाठी सोडून दिल्याचे हृदयद्रावक चित्र समोर आले आहे. यंदा पावसाच्या अनिश्चिततेचा मोठा फटका खरीप पिकांना बसत आहे. सुरुवातीला पेरणी झाल्यानंतर पिकांची वाढ चांगली होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, गेल्या महिनाभरापासून पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील ओलावा कमी झाला आणि उभ्या पिकांनी माना टाकण्यास सुरुवात केली. सोयाबीनचे पीक अक्षरशः वाळून गेल्याने त्यातून उत्पादन मिळण्याची शक्यता मावळली आहे. रमेश जाधव यांनी मोठ्या कष्टाने आणि खर्च करून तीन एकरांत सोयाबीनची लागवड केली होती. मात्र, पावसाअभावी (पान ३ वर)

# रोटरी क्लब जालना मिडटाऊनतर्फे सहा शिक्षकांना नेशन बिल्डर पुरस्कार प्रदान



जालना/ प्रतिनिधी : रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनच्यावतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून सहा शिक्षकांचा 'नेशन बिल्डर अवॉर्ड' देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन क्लबचे अध्यक्ष अलोक नानावटी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी कॉप्स प्रेसिडेंट प्रमोद झांझरी हे उपस्थित होते. व्यासपीठावर सचिव मनमोहन भक्कड यांची उपस्थिती होती.

यावेळी श्री. नानावटी म्हणाले की, राष्ट्राच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अनन्यसाधारण असून, भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत शिक्षकांचा 'नेशन बिल्डर' म्हणून सन्मान करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. झांझरी यांनी शिक्षकांच्या समाज व राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे महत्त्व अधोरेखित करून रोटरी क्लबच्या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी गणेश कुंडलिक तांबेकर, श्रीमती एस. पी. राठोड, ओमप्रकाश गाढवे, श्रीमती दीपली उगलमुगले, श्रीमती पौर्णिमा सोमाणी आणि संतोष नागवडे या सहा शिक्षकांना 'नेशन बिल्डर अवॉर्ड' प्रदान करून गौरविण्यात आले. यावेळी शिक्षकांनी मनोगत व्यक्त करताना शिक्षक (पान ३ वर)

# क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी डॉ. आप्पासाहेब कदम

जालना, प्रतिनिधी : क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी शेतकरी नेते डॉ. आप्पासाहेब ओंकारराव कदम यांची, तर जालना जिल्हाध्यक्ष तथा जिल्हाप्रमुखपदी विष्णू रंगनाथ शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर, प्रदेशाध्यक्ष राजीव कसबे, प्रदेश समन्वयक सचिन पांडुळे, प्रदेश कार्याध्यक्ष सुरेश गवळी यांच्यासह वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या सर्वानुमते या नियुक्त्या करण्यात आल्या.

डॉ. आप्पासाहेब कदम हे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने



कार्यरत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय, तालुका व जिल्हा कृषी कार्यालय, भूमिअभिलेख कार्यालय, वनीकरण विभाग, आदिवासी विकास विभाग, दुय्यम निबंधक व जिल्हा निबंधक कार्यालय, तहसील कार्यालय तसेच विविध सहकारी व सरकारी बँका, महावितरण आदी विभागांशी संबंधित शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे.

शेतकऱ्यांच्या प्रशासकीय अडचणी, विविध योजनांचा लाभ, बँकिंगविषयक प्रश्न, वीज तसेच महसूल व कृषी विभागाशी संबंधित समस्यांसाठी त्यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत संघटनेने त्यांच्यावर प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली आहे.

त्याचबरोबर शेतकरी प्रश्नांसाठी सक्रिय असलेले विष्णू रंगनाथ शिंदे यांच्यावर जालना जिल्हाध्यक्ष तथा जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संघटनेची जिल्ह्यातील बांधणी अधिक मजबूत करणे, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे तसेच (पान ३ वर)

# बदनापूर शहरातील हनुमान मंदिर परिसरातील निंदनीय प्रकार; पोलिसांत गुन्हा दाखल, परिसर स्वच्छतेला सुरुवात

**नवनाथ गव्हाणे बदनापूर** / प्रतिनिधी बदनापूर शहरातील पवित्र हनुमान मंदिर परिसरात काही अज्ञात समाजकंटकांनी गोवंशाचे कातडे व मांस अवशेष आणून टाकल्याची अत्यंत संतापजनक आणि निंदनीय घटना समोर आली आहे. या घटनेची माहिती मिळताच तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची पाहणी करण्यात आली. प्रशासकीय कारवाई व महत्त्वाचे मुद्दे घटनेचे गांभीर्य ओळखून लगेचच स्थानिक पोलिसांना घटनास्थळी बोलावण्यात आले. धार्मिक भावना दुखावण्याचा आणि शांतता भंग करण्याचा हा जाणीवपूर्वक प्रयत्न असून, अज्ञात समाजकंटकांवर कठोर कायदेशीर कलमान्वये गुन्हा



**नागरीकांना केले शांततेचे आवाहन**

**हा प्रकार बदनापूरमधील सामाजिक सलोखा बिघडवण्यासाठी केला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संयम बाळगावा. पोलीस प्रशासन आणि स्थानिक यंत्रणा योग्य ती कारवाई करत असून, दोषींना कायद्यानुसार कठोर शासन मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा सुरू राहील. परिसराचे पावित्र्य आणि शहराची शांतता टिकवून ठेवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.**

दाखल करण्यात आला आहे. सखोल चौकशीची मागणी: पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला असून पुराव्यांच्या आधारे दोषींचा शोध घेतला जात आहे. हा विकृत खोडसाळपणा करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. परिसर स्वच्छतेचे आदेश: संबंधित संपूर्ण परिसराचे पावित्र्य राखण्यासाठी नगरपंचायतीच्या स्वच्छता विभागाला तात्काळ सूचना देण्यात आल्या आहेत परिसर स्वच्छतेला सुरुवात झाली आहे. मंदिर आणि लगतचा संपूर्ण परिसर पूर्णपणे स्वच्छ,पूर्ववत करण्याचे काम नगरपंचायतीकडून युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे.

# संपादकीय

## देशाचे हित जोपासाव

राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो.

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले. आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत. नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो.नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे.

# मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या प्रयत्नात सरकारने मुख्य समस्या घेऊन येणाऱ्या बडग्यांच्या धारदार आवाजाला बोथट केले!

मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे कार्य सरकारने केले याचे मनापासून स्वागत.परंतु या उत्सवाच्या दरम्यान राज्यातील वर्षभरातील राजकीय-सामाजिक समस्यां, उथलपुथल आणि इतर समस्यांच्या बाबतींत निघणारे बडगे नागपूरकरांसह संपूर्ण महाराष्ट्राचे आकर्षण रहायचे परंतु ते यावर्षी तसे काही दिसले नाही व चर्चेचा विषय सुध्दा बनले नाही त्यामुळे मारबत बढग्यांना घेऊन गेली की काय असे सर्वत्र चित्र दिसत होते.मारबत उत्सव हा नागपूरकरांनसाठी ऐतिहासिक आणि पारंपरिक उत्सव आहे.मारबत उत्सवाची सुरूवात स्वतंत्रपुर्व काळापासून म्हणजे इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८१ मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४५ वर्षे पूर्ण झाले तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहास आहे.परंतु सरकारने मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या प्रयत्नात बडग्यांना महापालिकेने पायाखाली तुडविल्याचे दिसून आले. कारण यावर्षी मारबत उत्सवातदेश-विदेशातील प्रमुख पाहुणे मंडळी व राज्यातील राजकीय नेते प्रामुख्याने उपस्थित होते. यात परदेशी पाहुण्यांनमध्ये पॅट्रिक लेव्हेरीनो (फ्रान्सचे मुंबईतील कौन्सुल जनरल),मोनिका नागेलगार्ड(नॉर्वे चे मुंबईतील कौन्सुल जनरल),पेट्रा थेमन (फिनलंडच्या हेड ऑफ मिशन आणि कौन्सुल जनरल) आणि क्रीडा क्षेत्रातील उमेश यादव (भारतीय क्रिकेटपटू) व चित्रपट सृष्टीतील जॅकी श्रॉफ(प्रसिद्ध अभिनेते), अंकुश चौधरी,दिग्दर्शक सुभाष घई इत्यादी अनेक मान्यवरांसह अनेक मंत्री व राजकीय पुढारी प्रामुख्याने उपस्थित होते.त्यामुळे मारबत उत्सवात हीच मंडळी आकर्षण बनली व बडग्यांचे आकर्षण आपोआप कमी झाल्याचे दिसून आले.पुर्वी नागपूरमध्ये जेवढे काही बडगे निघायचे त्यांची गुंज (आवाज) संपूर्ण भारतभर जायची व सर्वत्र मोठ्या प्रमाणात चर्चा व्हायची. कारण यात जनसामान्यांच्या आवाज, समस्या व जनतेचा आक्रोश असलेल्या बडग्या व त्यांचा जल्लोष आणि सत्तेत असलेल्या सरकारला एक चांगला संदेश देऊन जागृत करणे बगडग्यांचे मुख्य उद्दिष्ट रहायचे परंतु यंदा समाज जागृतीची बढग्यांची धारदार तलवार मनपाने बोथट केली व बडग्यापासून मिळणारा जनसामान्यांचा संदेश व आनंद दुरावला.त्यामुळे असे वाटत आहे की, सरकारला समज देणारा बढग्यांचा आवाज सरकारने पुर्णतः दाबला की काय असे चित्र दिसून आले.कारण बडग्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या,दुष्काळ,पेपर फुटीच्या प्रकरणातील गुन्हेगार,रोडचे खड्डे, महिलांवरील अत्याचार, अशोक खरात सारखे प्रकरण, भ्रष्टाचार,घोटाळेबाज, टीईटी घोटाळा, महागाई, बेरोजगारी, एमपीएससी घोटाळा,आरक्षण,एआयमुळे बेरोजगारांवर आलेले संकट व वर्षभर घडलेल्या मुद्दांवर निघालेल्या घटनांवरील जाब विचारण्याची संधी बढग्यांनी गमावली की काय असे चित्र यावर्षी स्पष्ट दिसून आले. उलट पाकिस्तान, दहशतवाद आणि स्मार्ट मीटरविरोधापुरतेच राजकीय-सामाजिक भाष्य अधिक ठळक राहिले.त्यामुळे बडग्यांचा आवाज मनपाने मारबत उत्सवाच्या दरम्यान दाबला की काय असे वाटायला लागले.त्याचप्रमाणे महापालिकेने मारबत उत्सव ग्लोबल करण्यासाठी आणलेल्या व्हिआयपी झगमगाटामुळे बडग्यांचा धारदार आवाज बोथड केला.यावर्षी नागपूरची परंपरा व्हिआयपी झगमगाटात पुर्णपणे हरवली की, काय असे चित्र दिसून आले.मारबत नेहमीप्रमाणे निघाली आणि घेऊन जा गे मारबतच्या आवाजाचा गजरही सर्वत्र झाला,परंतु सत्तेने सरकारला जाब विचारणाऱ्या बढग्यांना धाराशाही करून त्यांचा आवाज बोथट केला. त्यामुळे नागपूरकरांना शंका आहे की, बढग्यांना मारबत घेऊन गेली की काय! असे वाटायला लागले. मारबत उत्सवाच्या निमित्ताने राज्यातील जनतेच्या समस्या, अडीअडचणी, बेरोजगारीची समस्या, पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या,एमपीएससी पेपर फुटी प्रकरण इत्यादी अनेक समस्यांचा अंबार सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम बढग्यांच्या माध्यमातून नेहमीच होत होते आणि याची चर्चा नागपूरपासून राज्यभर आणि राज्यापासून देशभर रहात होती.परंतु या सर्व समस्या राजकीय पुढारी व व्हिआपी लोकांनी संपुष्टात आणल्याचे दिसून आले.नागपूर मारबत उत्सवात बडग्यांचा जल्लोष किंवा आवाज नाही म्हणजे राज्यात काहीच समस्या नसून सर्व काही ठीक आहे अशा पध्दतीचा मारबत उत्सव यावर्षी दिसून आला.त्याचप्रमाणे यावर्षी राजकीय- सामाजिक प्रश्नांवरचा आवाज क्षीण झाल्याचे दिसून आले. मारबत- बडग्याचा हा सोहळा इंग्रजांच्या सत्तेला आव्हान देत सुरू झाला.तेव्हापासुन अन्याय, भ्रष्टाचार, अत्याचार, आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात बढग्यांनी नेहमी आवाज उठविला आहे.परंतू यंदा मात्र वर्षभर गाजलेल्या अनेक राजकीय-सामाजिक प्रश्नांवर अपेक्षित उपरोध दिसला नाही. त्यामुळे घेऊन जा गे मारबतचा गजर झाला खरा, पण बडग्यातून सत्तेला जाब विचारणारा आवाज यावर्षी मात्र क्षीण राहिला हे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

लेखक

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**



# हरतालिका तृतीया हा अखंड सौभाग्य आणि पतीच्या उदंड आयुष्यासाठी मानला जाणारा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण

हरतालिका तृतीया हा अखंड सौभाग्य आणि पतीच्या उदंड आयुष्यासाठी मानला जाणारा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा सण आहे. भाद्रपद महिन्याच्या शुद्ध तृतीयेला हे व्रत केले जाते, ज्यामध्ये महिला आणि कुमारिका कडक उपवास ठेवून भगवान शिव आणि माता पार्वतीची मनोभावे पूजा करतात. पौराणिक कथेनुसार, माता पार्वतीने महादेवाला पतीरूपात मिळवण्यासाठी जंगलात जाऊन कठोर तपश्चर्या केली होती आणि याच दिवशी शंकराने त्यांचा स्वीकार केला होता. निष्ठा, भक्ती आणि त्यागाचे प्रतीक असलेल्या या व्रताची पूजा कशी करावी आणि त्यासाठी कोणते साहित्य लागते, याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे :

हरतालिका तीज हा विवाहित महिलांसाठी महत्त्वाचा सण मानला जातो. यंदा १४ सप्टेंबर २०२६ रोजी गणेश चतुर्थीसोबत हरतालिका तीज येत आहे. या दिवशी महिला भगवान शिव आणि माता पार्वतीची पूजा करून पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत करतात.

**शिव-पार्वतीच्या मूर्ती**

हरतालिका तीजच्या पूजेसाठी शिव, पार्वती आणि भगवान गणेशाच्या मातीच्या किंवा वाळूच्या प्रतिमा तयार केल्या जातात. पूजा झाल्यानंतर या प्रतिमांचे विसर्जन करण्याची परंपरा आहे. पूजेसाठी लाल चुनरी, बिंदी, बांगड्या, मेहंदी, सिंदूर, कुंकू, काजळ, कंगवा, जोडवी, पैंजण यांसारखे सौभाग्याचे साहित्य ठेवले जाते. या साहित्याला पूजेमध्ये विशेष महत्त्व असते. रोळी, अक्षता, हळद, चंदन, मौली, कापूर, कापूस, उदबत्ती, तुपाचा दिवा आणि माचिस यांसारख्या वस्तू पूजेसाठी आवश्यक असतात.भगवान शिवाच्या पूजेसाठी बेलपत्राला विशेष महत्त्व आहे. यासोबत फुले, फुलांच्या माळा, दूर्वा आणि शमीची पानेही पूजेसाठी



ठेवली जातात. पूजेसाठी फळे, मिठाई, खीर, हलवा आणि भिजवलेले हरभरे यांचा नैवेद्य दाखवला जातो. आपल्या परंपरेनुसार नैवेद्याच्या पदार्थांमध्ये बदल केला जाऊ शकतो. पूजेसाठी कलश, स्वच्छ पाणी आणि गंगाजल ठेवले जाते. कलशासोबत नारळ आणि पूजेसाठी आवश्यक इतर साहित्याचीही तयारी केली जाते. शिव-पार्वतीच्या पूजेसाठी पंचामृत तयार केले जाते. यासाठी दूध, दही, मध, साखर आणि तूप या पदार्थांचा वापर केला जातो. पूजेसाठी पान, सुपारी, कच्ची हळदीच्या गाठी, गहू किंवा तांदूळ आणि कच्चा सूत यांसारखे साहित्यही आवश्यक असते.पूजेसाठी चौकी किंवा आसन तयार केले जाते. मंडपासाठी केळीची पाने आणि सजावटीसाठी फुले वापरली जातात. पूजा सुरू करण्यापूर्वी सर्व साहित्य व्यवस्थित मांडून ठेवणे सोयीचे ठरते. हरतालिका तीजचे व्रत अनेक महिला निर्जला ठेवतात. म्हणजेच या दिवशी अन्न आणि पाणी ग्रहण केले जात नाही. मात्र, आरोग्याच्या दृष्टीने उपवास करण्यापूर्वी स्वतःच्या प्रकृतीचा विचार करणे महत्त्वाचे आहे. हरतालिका तीजच्या दिवशी रात्री जागरणाला धार्मिक महत्त्व दिले जाते. तसेच शिव-पार्वतीची पूजा केल्यानंतर हरतालिका तीजची कथा ऐकण्याची परंपरा आहे. दुसऱ्या दिवशी सूर्योदयानंतर व्रत सोडले जाते.

# नाशिकमध्ये 'स्टार रेट'वरुन रणकंदन

नाशिक महानगरपालिकेच्या विकासकामांसाठी प्रशासनाने अलीकडेच 'स्टार रेट' ही दरनिर्धारण प्रणाली लागू केली आहे. मात्र, राज्य शासनाची प्रचलित डीएसआर अर्थात शासनमान्य दरसूची असतानां ही नवीन प्रणाली लागू करण्यामांगील उद्देशावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या निर्णयामुळे केवळ विरोधकच नव्हे, तर सत्ताधारी गटातील लोकप्रतिनिधीही प्रशासनावर नाराजी व्यक्त करत असून, या मुद्द्यावरून महापालिकेत चांगलेच रणकंदन सुरू आहे. या वादाचा थेट परिणाम विकासकामांवर होत असल्याने नागरिकांमध्येही असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे ही प्राधिकरणामार्फत सुरू आहे. शहरातील विकासकामे मनपा प्रशासनामार्फत केली जात आहेत. परंतु मनपा प्रशासनाकडून सुरू असलेली किंवा प्रस्तावित कामे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कुंभमेळ्याशी संबंधित आहेत. नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा आता अवघ्या एका वर्षावर येऊन ठेपला आहे. सुमारे सात महिन्यांनंतर, २०२६ मध्ये कुंभमेळ्याचे ध्वजारोहण होणार असून, त्यानंतर प्रत्यक्ष कुंभपर्वाच्या तयारीला अधिक वेग येणार आहे. अशा महत्त्वाच्या टप्प्यावर शहरातील पायाभूत सुविधा आणि विकासकामे युद्धपातळीवर पूर्ण होणे अपेक्षित आहे. यानंतर पुढील कुंभमेळा उज्जैन येथे होणार असून, तेथील प्रशासनानेही विकासकामांना मोठ्या प्रमाणावर गती दिली आहे. त्या तुलनेत नाशिकमध्ये मात्र दरनिर्धारणाच्या वादामुळे विकासकामांवर परिणाम होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. महापालिका प्रशासनाने लागू केलेल्या 'स्टार रेट' (डीरी ठरींश)प्रणालीत बाजारातील वस्तूंच्या किंमतीत वाढ झाल्यास त्यानुसार दरांमध्ये बदल करून ठेकेदारांना अतिरिक्त मोबदला मिळण्याची तरतूद असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या प्रणालीमुळे विकासकामांच्या खर्चात वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याउलट, राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा पातळीवरील बहुतांश शासकीय कामे शासनमान्य डीएसआर दरसूचीनुसार केली जातात.

# नशा बंदी ही काळाची गरज नसता वाईट परिणाम

नशामुक्ती अभियानाचा मुख्य उद्देश मादक द्रव्यांपासून मुक्त करणे, तरुणाईला जागृत करणे आणि नशा व्यक्तींचे पुनर्वसन करणे ही आहेत. म्हणजे नशामुक्ती अभियान निरोगी जीवन आणि आनंददायी समाज घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी देशातील तरुणाईमध्ये नशामुक्ती विषयी जनजागृती अतिशय महत्त्वाची आहे. काही ठिकाणी नशा करून गळफास घेतल्याची उदाहरणे आहेत. तसेच अपघात झालेले आहेत तरी सुद्धा आकस्मिक मृत्यूची नोंद केली जाते. बस डेपोच्या परिसरात, रेल्वे पटरी, पडीत इमारतीमध्ये, वस्ती नसलेल्या रस्त्याच्या बाजूच्या झुडपात, फुटपाथ, रेल्वे प्लॅटफॉर्मवर इत्यादी ठिकाणी नशा करणारी मुले व वृद्ध व्यक्ती पाहायला मिळतात. यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्तीसाठी जनजागृती झाली पाहिजे. त्यासाठी मादक द्रव्यांच्या सेवनामुळे होणारे वाईट परिणाम सुजाण नागरिकांना सांगावे लागतील. यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, विविध स्वयंसेवी संस्था अशा संस्थांमार्फत जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी. तसेच त्या आनुषंगाने विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यसनाधीन झालेल्या नागरिकांचे सुद्धा योग्यप्रकारे समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत. यातून निरोगी समाज कसा निर्माण करता येईल त्या दृष्टिकोनातून मादक द्रव्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल, त्याप्रमाणे प्रयत्न करावा. यातून देशात निरोगी समाज निर्माण करता येईल. याचा चांगला परिणाम लोकांचे सरासरी आयुर्मान वाढण्याला मदत होणार आहे. याला कारण वैद्यकीय सेवा आणि पोषण आहार म्हणता येईल. याच्या जोडीला नशामुक्ती महत्त्वाची आहे. सध्या देशात मादक द्रव्यांचा विचार केल्यास यात तरुण पिढी जास्त आहारी गेलेली दिसत आहे. यामुळे विकसित भारत राष्ट्र कसे होणार? केवळ जनजागृती करून चालणार नाही, तर शासन पातळीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. एकीकडे मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध



करणे आणि दुसरीकडे शासन मान्य देशी दारूचे दुकान म्हणून मान्यता देणे. त्याला सुजाण नागरिकांनी विरोध केल्यास शासनाचा महसूल बुडतो अशी आरडाओरड सुरू केली जाते. मात्र यावरती कायदेशीरपणे प्रतिबंध होणे गरजेचे आहे. यासाठी सामूहिक जागृती, पथनाट्य व पोस्टर्स लावून जनजागृती केली जात आहे. काही ठिकाणी तरुण पिढी बरबाद होऊ नये म्हणून दुकाने बंद करण्याचा प्रयत्न सुद्धा झाला. दारूची दुकाने काही दिवस बंद करण्यात आली. मात्र काही दिवसांनी पुन्हा दारूची दुकाने सुरू करण्यात आली. मादक द्रव्यांच्या सेवनाने गंभीर आजार, मानसिकदृष्ट्या खचून जाणे, कर्जबाजारी, शारीरिक समस्या अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. ग्रामीण भागात अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत चालले आहेत. काही ठिकाणी मुलांना वडिलांच्या मादक द्रव्यांच्या सेवनाने शाळा शिकण्याची इच्छा असून सुद्धा घरची आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे अर्धवट शाळा सोडून तुटपुंज्या पगारावर बारा तास काम करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे देशातील दारिद्र्य निर्मूलन होणार नाही. यात गरीब अधिक गरीब होत जाणार आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाणार आहे. जर भारत सरकारला देश विकसित करायचा असेल तर ही आर्थिक दरी कमी करावी लागणार आहे. ज्या गरिबांसाठी योजना आहेत त्या गरिबांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तसेच त्यांना त्यांच्या मूलभूत हक्कांची जाणीव करून द्यायला हवी. नशामुक्ती भारत अभियान राबविताना मादक द्रव्यांच्या सेवनाने जे दुष्परिणाम निर्माण होतात त्याची प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती होणे गरजेचे आहे. तेव्हा तरुणाई नशेच्या आहारी न जाता ग्रंथालयात गेले पाहिजेत. चांगल्या लेखकांच्या पुस्तकांचे वाचन करायला हवे. दररोज वर्तमानपत्रे वाचल्याने आपल्या परिसरातील घडामोडी समजून चांगल्या मार्गाचा अवलंब करू शकतो. म्हणजे नकळत असा बदल घडत असतो. हे भविष्याच्या दृष्टीने चांगले आहे. तेव्हा देशात विकासाच्या दृष्टिकोनातून नशामुक्ती भारत अभियान देशातील प्रत्येक जिल्ह्यात राबविणे गरजेचे आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# महाराष्ट्रासह देशात गणेशोत्सवाची जय्यत तयारी!

संपूर्ण सृष्टीचे पालनहार देवाधिदेव महादेव भोले शंकर,तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता सागर आहेत. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा-अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते. नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते दैवत. देशात कोणत्याही देवी-देवतांची पुजा असो,परंतु आरतीची सुरूवात गणपतीच्या आरती पासून होत असते.याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम सुध्दा श्रीगणेशांनी केले.श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही. परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले.भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वर्दान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.श्रीगणेशजी विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ-लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.



आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर,भालचंद्र,गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो. त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते. त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुद्धीचा अधिष्ठाता, विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती-पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला आगळेवेगळे महत्त्व असून वेगवेगळ्या देवी-देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा-अर्चना केली जाते.प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण आपली मनोकामना पूर्ण करण्याचा सर्वच प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला रोषणाईची झगमगाट दिसून येते.यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण लोक मोठ्या उत्साहाने व गुना गोविंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पा पुन्हा लवकर यावा यासाठी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर याघोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली.गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभारला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रासह भारतात दिसुन येते. त्यामुळेच महाराष्ट्रात



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

गणेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा-अर्चना केली जाते.पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा, बेल-फुल,शम्मीपत्र,शेंदूर यांचा मुख्यत्वे करून वापर होतो. भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ-मोठी नामांकित मंदिरे आहेत. त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात.कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो आपल्याला दिसुन येते.मानवजातीला द्वेवी-देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत,प्रशासना मार्फत, शाळा-महाविद्यालय, सामाजिक संस्थांमार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत वृक्षारोपण व्हायला पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय रोखण्यास मोठी मदत होईल, पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व सर्वत्र हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद अवश्य दिसून येईल.गणपती बाप्पा मोरया!

# ‘ओंजळभर पाण्या’चे शतक

कोकण विभागातील रायगड जिल्ह्यातील महाडमधील ऐतिहासिक अशा चवदार तळ्याचा सत्याग्रह २० मार्च १९२७ रोजी थोर प्रज्ञावंत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना पाण्याचा हक्क मिळण्यासाठी केला. या ऐतिहासिक घटनेच्या शतक महोत्सवाला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. या ऐतिहासिक दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता रायगड पोलीस दलातर्फे २१ पोलिसांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चवदार तळ्याच्या प्रांगणामध्ये मानवंदना देण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट, फलोत्पादन, रोजगार हमी, खार जमीन विकास मंत्री भरतशेट गोगावले, विविध शासकीय अधिकारी आणि बाबासाहेबांची लेकरे उपस्थित होती. त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे व अन्य मान्यवर उपस्थित होते. राज्याचे मुख्यमंत्री यांनी प्रथम बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर महाडच्या ऐतिहासिक भूमीवर असलेल्या भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. या पुतळ्याच्या खाली हा संगर केवळ पाण्यासाठी नसून मानवी मूलभूत हक्कांसाठी आहे असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले आहे. बाबासाहेबांच्या पुतळ्याच्या समोर २० मार्च ही तारीख झेंडूंच्या फुलांनी सजवलेली होती, तर बाजूने झेंडूंच्या फुलांच्या माळा करून लावल्या होत्या. त्यामुळे बाबासाहेबांचा पुतळा अधिक आकर्षित दिसत होता. चवदार तळ्याच्या बाजूच्या काठावर झेंडूंच्या फुलांच्या माळा करून लावल्या होत्या. बाजूने मंडप उभारले होते. स्मारक फुलांनी सजवले होते. उपस्थित आंबेडकरी अनुयायांना बसण्यासाठी व्यवस्था केली होती, तर चवदार तळ्याच्या बाजूने आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती. त्यामुळे चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या बाबासाहेबांच्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला. प्रत्येक आंबेडकरी अनुयायी बाबासाहेबांना अभिवादन करीत होता. त्या परिसरात आंबेडकरी साहित्याची पुस्तके सवलतीच्या दरात विक्रीस ठेवण्यास आलेली होती. अनेक आंबेडकरी नेत्यांच्या सभा परिसरात सुरू होत्या. त्यात गायन पार्टीचा कार्यक्रम जोरात चालू होता. अनेक आंबेडकरी कार्यकर्ते बाबासाहेबांची गाणी ऐकण्यात गुंग होते. भीम सैनिकांच्या प्रचंड



गर्दीने पूर्ण परिसर फुलून गेला होता. कडक उन्हाची तमा न मानता आंबेडकरी अनुयायी बाबासाहेबांच्या नावाच्या घोषणा देऊन बाबासाहेबांचा जय जयकार करत होते. आज जे आपण माणूस म्हणून जगतो आहोत त्याचे एकमेव कारण म्हणजे बाबासाहेब होय, याची पूर्ण कल्पना त्यांना आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी उपस्थित आंबेडकरी अनुयांना मार्गदर्शन करताना त्यांनी या ऐतिहासिक भूमीत जीर्णो द्धाराचा संकल्प केला आहे. या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्यासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून लाखो आंबेडकरी अनुयायी महाड चवदार तळ्यावर येऊन शतक महोत्सवी वर्षाचे साक्षीदार झाले आहेत. म्हणजे काल ऐतिहासिक भूमीवर भीम सैनिकांचा महासागर लोटला होता. राज्यातील अनके संस्था एकत्र येऊन या ऐतिहासिक घटनेची एक आठवण म्हणून विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करीत आहेत. काही संस्थांनी त्या ठिकाणी जाऊन शतक महोत्सवी वर्षानिमित्ताने महाड क्रांतिदिन महोत्सवाचे आयोजन केले.

आपल्या राज्याच्या अर्थसंकल्पात राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्याच्या अर्थमंत्री पदाचा कार्यभार सांभाळणारे देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे ६ मार्च २०२६ रोजी घोषित केले. तसेच महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून महाड चवदार तळ्याचे सुशोभीकरण करण्यासाठी २५ कोटी रुपये निधींची तरतूद करण्यात आली आहे, तर महाराष्ट्र सरकारच्यावतीने या ऐतिहासिक स्थळाला ‘सामाजिक समतेचे प्रतीक’ म्हणून चवदार तळ्याचे सुशोभीकरण, जलशुद्धीकरण आणि पर्यटन सुविधा पुरविण्यासाठी शतक महोत्सवी वर्षानिमिताने ५५.८० कोटी रुपये विकास आराखडा तयार करण्यात येऊन तो राबविण्यात येणार आहे. तसेच लाखो आंबेडकरी अनुयायी चवदार तळे सत्याग्रहाच्या निमित्ताने येत असल्यामुळे त्यांची निवास व्यवस्था, आरोग्य सेवा, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन स्थानिक प्रशासनाच्या वतीने करण्यात आली. महाडमधील चवदार तळ्यावर पिण्याच्या पाण्याचा सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी करून चवदार तळे दलितांना पिण्याच्या पाण्यासाठी खुले करून दिले. आपल्या देशातील सामाजिक समतेचा हा पहिला सत्याग्रह आहे. त्यामुळे महाडचे चवदार तळे म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक क्रांतीचा ऐतिहासिक ठेवा आहे. आज जरी चवदार तळे सत्याग्रह महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाने जगप्रसिद्ध झाले तरी महाड चवदार तळ्यातील ओंजळभर पाण्याने खरा इतिहास घडविला आहे. तेव्हा महाडच्या चवदार तळ्यावर ऐतिहासिक सत्याग्रह झाला त्या घटनेचे शतक महोत्सवी वर्ष साजरे करण्यात सुरुवात जरी झाली तरी खरे शतक ओंजळभर पाण्याचे समजून घेतले पाहिजे. त्यासाठी सुद्धा संघर्ष करावा लागला होता. तरच महाड चवदार तळ्याचे शतक महोत्सव वर्ष साजरे केल्याचे फलित होईल.

### गणेशोत्सव ..

वाजू लागे ताशाढोल
सगळे धरतात ताल
माणूस उत्सव प्रेमी
वेगळेपण त्या बहाल

उत्सवीसामील होता
तुटे जात मायाजाल
समीकरण बदलेलं
जे चाले सालोसाल

एक संधी एक रंगी
सहज तुम्हीचं व्हालं
विसरूनि लहानथोर
सुख आनंदात न्हालं

शोभून दिसे उत्सवी
कुटी जवळ महाल
आगळी वेगळी असे
निधर्मीपणाची ढाल

माणसाच्या अंगावरी
उत्सवी रेशमी शाल
दुःखावर फुंकर घाले
जादुई जणू कमाल

असे कुठल्या धर्माचा
सामील व्हावे खुशाल
उत्सव ओळख खरी
रहाल नीत खुशहाल

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

### श्री गणेशा ..

**फिटेपारणे डोळ्यांचे**
**श्री चे रूप मनोहर**
**पहाया लोटली गर्दी**
**आरास सुरेख सुंदर**

**सुस्वागतम् गणराया**
**सुवर्ण पाऊलाने या**
**परिस वास्तवे तुझ्या**
**माया करी बा मोरया**

**गर्दीचा फायदा घेऊन**
**कुणी करी टगेगिरी**
**धक्काबुक्कीछेडछाड**
**पाकीटमारी नि चोरी**

**उत्सव हो उत्साहानं**
**ठेऊनि थोडसं भानं**
**निर्मल करूनि मनं**
**संपवून टाकू रे घाणं**

**असे कुठल्या धर्माचा**
**सामील व्हावे खुशाल**
**उत्सव ओळख खरी**
**रहाल नीत खुशहाल**

**उत्सवामागचे कारणं**
**असावी सदैव जाणं**
**माणूस संस्कृती प्रेमी**
**महोत्सव आपले प्राण**

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

**पान १ वरुन**

## समृद्धी दाभाडेचा क्रिकेट

अभ्यास आणि क्रिकेट या तिन्हींचा ताळमेळ साधत समृद्धी जिद्दीने पुढे जात आहे. समृद्धी सध्या चैतन्य इंग्लिश स्कूल, बदनापूर येथे शिक्षण घेत आहे. तिच्या या यशाबद्दल प्रशिक्षक राजू कोने यांनी तिचे कौतुक करत भविष्यात समृद्धी दाभाडे हिने निश्चितच आणखी मोठी भरारी घ्यावी, असा विश्वास व्यक्त केला. धोपटेश्वरच्या या लेकीच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण असून, तिच्या जिद्दीची आणि मेहनतीची इतर मुलींनाही प्रेरणा मिळत आहे.

## जालन्यात बळीराजाची

संपूर्ण पीक हातचे गेल्याने लागवडीचा खर्चही निघणार नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अखेर त्यांनी स्वतःच उभे पीक उपटून फेकण्याचा निर्णय घेतला. शेतातील सुकलेले सोयाबीन जनावरांच्या चरण्यासाठी सोडून देण्याची वेळ त्यांच्यावर आली. पिके वाळली, खर्च बुडाला आणि उत्पन्नाची आशा मावळली, अशा तिहेरी संकटात परिसरातील शेतकरी सापडले आहेत. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे आणखी किती क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे, याचा तातडीने प्रशासनाने आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे. दरम्यान, प्रशासनाने संबंधित भागातील वाळलेल्या व नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, तसेच बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार आर्थिक मदत व पीक नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.बळीराजाच्या डोळ्यांसमोर उभे पीक वाळत असताना प्रशासन आता तरी जागे होणार का? असा सवालही या घटनेमुळे उपस्थित होत आहे.

**पान १ वरुन**

## रोटरी क्लब जालना

म्हणून कार्य करताना आलेले अनुभव व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी क्लबचे सदस्य शैलेश ठक्कर, लिटरेसी डायरेक्टर भूषण देविदान यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी पंकज पाटणी, डॉ. प्रतिक लाहोटी, गौरव मोदी, सुरज गेही, अमित शाह, प्रशांत बागडी, पियुष मुथा, दीपक गेही, धवल मिश्रीकोटकर, ड. महेश धन्नावत, राहुल रुणवाल, अक्षय जयस्वाल आदींची उपस्थिती होती. शेवटी क्लबचे सचिव मनमोहन भक्कड यांनी आभार प्रदर्शन केले.

**पान १ वरुन**

## क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या

त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटित लढा उभारण्याची जबाबदारी ते पार पाडणार आहेत. शेतकऱ्यांच्या सन्मान आणि न्यायासाठी लढणार संघटनेने दिलेल्या पदाचा उपयोग शेतकरी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच त्यांना सन्मान आणि न्याय मिळवून देण्यासाठी केला जाईल. शेतकरी आणि तरुणांना चळवळीशी जोडून त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष उभारू. संघटनेच्या प्रत्येक क्रांतिकारी आंदोलनात व चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन शेतकरी हितासाठी प्राणपणाने लढू, असा संकल्प डॉ. आप्पासाहेब कदम आणि विष्णू शिंदे यांनी नियुक्तीनंतर व्यक्त केला.

या नियुक्त्यांमुळे जालना जिल्ह्यात क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्याला अधिक बळ मिळणार असून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून व्यापक चळवळ उभी करण्याचा निर्धार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### श्री.गणेश ..

आगतम् सुस्वागतम्
आले आले गणपति
क्षण क्षण भारावलेले
जोवर राही अधिपती

उत्सवी उन्माद नको
जागवू छान संस्कृती
उत्साही प्रमाद नको
अशीचं बनवूआकृती

खास छान घडवली
पर्यावरण पुरक मुर्ती
संरक्षित बनतो वृत्ती
निरागस राहे प्रकृती

कलागुणांचा देव तो
मिळत रहावी स्फुर्ती
माझ्याआधी दुजा दे
नित्य हो वचन पूर्ती

संकटे येवो कितीही
लाभो लढाया शक्ती
निरपेक्ष सेवा घडावी
हृदयी निर्मळ भक्ती

सकल संतु निरामय :
सर्वे भद्राणी पश्यंति
जीवन सार्थकी होई
मोक्ष लाभावा अंती

**- हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

### राडा ..

इतकीद्यायची वर्गणी
पावत्या सरारा फाडा
हजारोत बोले सगळे
अन्यथाकरणार राडा

दंडेल शाही धुमाकूळ
सुशिक्षित गुंडांचावेढा
विरोध जरासा करता
चालतो तुंबळ बखेडा

रस्त्यावर घाले मांडव
भक्कम रस्त्यां फाडा
अतिक्रमण ऐसीतैसी
फुटपाथ सुध्दा फोडा

नगर सेवक आपलेचं
कुणी न घालेल खोडा
उद्घाटना येतीलंसाहेब
भरवायचा मैत्रीचापेढा

सामील सकल यंत्रणा
सहजते सुटणार तिढा
नृत्यांगना खासबोलवे
शांतवे अश्लिल किडा

विरोधक नि सत्ताधारी
सर्वांना एकत्रचं ओढा
आमंत्रण सुखेस्विकारे
प्रसिध्दीचा सर्वां ओढा

परंपरा अन् सुसंस्कृती
जाऊद्या सद्हेतुस तडा
सामान्यास नसतो कंठ
टाकणार मिठाचा खडा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीतील अडचणी तातडीने सोडवा : राहुल लोणीकर

## उस्वद येथे शेतकऱ्यांच्या तक्रारींची तत्काळ दखल; संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून दिल्या स्पष्ट सूचना

मंठा, प्रतिनिधी : मंठा तालुका दौऱ्यावर असताना उस्वद येथे शेतकरी बांधवांनी कर्जमाफीची रक्कम खात्यात जमा होण्यास येत असलेल्या अडचणी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या निदर्शनास आणून दिल्या. शेतकऱ्यांच्या तक्रारींची तात्काळ दखल घेत लोणीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी फोनवरून संपर्क साधत प्रलंबित प्रकरणांचा जाब विचारला. कर्जमाफीसाठी पात्र असतानाही काही शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होण्यास अडचणी येत असल्याची बाब शेतकऱ्यांनी राहुल लोणीकर यांच्यासमोर मांडली. यामुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही शेतकऱ्यांनी सांगितले. यावर लोणीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने प्रकरणांची तपासणी



करण्याच्या सूचना दिल्या. कोणत्याही पात्र शेतकऱ्याला तांत्रिक अथवा प्रशासकीय कारणामुळे कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये. प्रलंबित प्रकरणांची तातडीने दखल घेऊन आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी आणि संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्याची कार्यवाही करावी, अशा स्पष्ट सूचना राहुल लोणीकर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. शेतकऱ्यांची अडचण म्हणजे आपली अडचण शेतकरी बांधवांच्या अडचणी सोडविण्यासाठी तात्काळ निर्णय घेऊन तत्परतेने कार्यवाही करणे हीच माझी भूमिका आहे. पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा लाभ वेळेत मिळाला पाहिजे. यामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई सहन केली जाणार नाही, असे राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांनी थेट मांडलेल्या प्रश्नावर लोणीकर यांनी जागेवरूनच संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून कार्यवाहीच्या सूचना दिल्याने शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले.



गणपती बाप्पाचे आगमन उद्या होणार असून लोकांनी बाजारात गणपती घेण्यासाठी गर्दी केल्याची दिसून येत आहे व बाजारात विविध प्रकारच्या आकर्षक मुर्त्या ही लोकांचे मनमोहन घेत आहे
**छायाचित्र किरण खानापुरे**



गौरीचे आगमन म्हणजेच महालक्ष्मीचे आगमन अवघ्या पाच दिवसात घेऊन ठेवले असून लक्ष्मी यांचे आकर्षक व देखणे मुखवटे बाजारात दाखल झाले असून महिलांची खरेदी करण्यासाठी गर्दी दिसत असून विविध प्रकारच्या लहान लहान मूर्ती सुद्धा बाजारात उपलब्ध आहे. **छायाचित्र किरण खानापुरे**

## प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे बंजारा समाजाचा रास्ता रोको आंदोलन

परभणी । प्रतिनिधी : परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी बंजारा समाजाच्या वतीने एल्गार पुकारत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात मराठवाड्यातील हजारो समाज बांधवांनी सहभाग नोंदवून सरकार आणि प्रशासनाचा तीव्र निषेध केला. बंजारा समाजाला अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी हे आंदोलन छेडण्यात आले होते.गेल्या ७८ वर्षांपासून बंजारा समाज या आरक्षणाच्या हक्कापासून वंचित राहिल्याची भावना विजय नायक चव्हाण यांनी व्यक्त केली. मराठवाड्यात इतर समाजाच्या मागण्यांसाठी शिष्टमंडळ पाठवून लगेच दखल घेतली जाते,मात्र बंजारा समाजाच्या उपोषणाकडे आणि मागण्यांकडे सरकार दुजा भाव व दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आगामी १७ सप्टेंबर रोजी (मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त) पालकमंत्र्यांच्या ध्वजरोहण कार्यक्रमाचा निषेध नोंदवण्यासाठी तांड्या-तांड्यातून काळे झेंडे दाखवून आंदोलन पुकारण्याचे आवाहन विजय नायक चव्हाण यांनी समाज बांधवांना केले आहे. आंदोलनकर्त्यांनी व समाज बांधवांना संयम बाळगून शांततेच्या मार्गाने व लोकशाही मार्गाने लढा पुढे नेण्याचे आवाहन केले.या आंदोलनात मोठ्या संख्येने उपस्थित नागरिकांनी जय सेवालाल आणि जय गोरजय वसंतराव नाईक साहेब च्या घोषणा देत परिसर दुमदुमून सोडला होता.

# श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त वनदेव मंदिरात प्रवेशद्वाराचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते भूमिपूजन सोहळा पार पडला

जालना :जालना शहरातील श्री चक्रधर स्वामी यांच्या चरणांकित स्थानाने पावन झालेल्या वनदेव मंदिर परिसरात श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त प्रस्तावित प्रवेशद्वाराचे भूमिपूजन आज उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात पार पडले. शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते या प्रवेशद्वाराच्या कामाचा विधिवत शुभारंभ करण्यात आला. श्री चक्रधर स्वामी अवतार दिनाचे औचित्य साधून वनदेव मंदिर परिसरात धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्रोच्चार व विधिवत पूजा-अर्चा करून प्रस्तावित प्रवेशद्वाराचे भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित भाविकांनी श्री चक्रधर स्वामींचे दर्शन घेतले. त्यामुळे संपूर्ण मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. वनदेव मंदिर हे श्री चक्रधर स्वामी यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेले धार्मिक व ऐतिहासिक स्थळ म्हणून महानुभाव पंथीय भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी भाविकांची नियमित वर्दळ असते. मंदिर परिसराच्या विकासाच्या दृष्टीने प्रवेशद्वाराचे काम महत्त्वपूर्ण ठरणार असून, यामुळे मंदिराची भव्यता आणि परिसराच्या सौंदर्यात निश्चितच भर पडणार आहे. यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचा विकास करताना त्यांच्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त केली. श्री चक्रधर स्वामी यांनी समाजाला दिलेला समतेचा, अध्यात्माचा आणि मानवतेचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा पवित्र स्थळांचे संवर्धन व विकास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वनदेव मंदिराच्या प्रस्तावित प्रवेशद्वारामुळे मंदिराची स्वतंत्र ओळख अधिक ठळक होण्यास मदत होणार आहे. मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी हे प्रवेशद्वार आकर्षणाचे केंद्र ठरण्यासोबतच परिसराच्या विकासाला नवी दिशा देणारे ठरेल, अशी भावना यावेळी उपस्थित मान्यवर व भाविकांनी व्यक्त केली. श्री चक्रधर स्वामी अवतार दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमाला प.पू. महंत श्री. आकाश बाबाजी कोठी यांच्यासह महानुभाव पंथातील संत-महंत, शिवसेना पदाधिकारी, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, स्थानिक नागरिक तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी **प.पू. म. आकाश बाबाजी कोठी, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, विनीत सहानी, नगरसेवक श्रीकांत पांगारकर, रवी भुतेकर,



नगरसेवक सुनील पांगारकर, अमोल महाजन, पत्रकार गुलाब पाटील, डॉ. बळीराम बागल** यांच्यासह परिसरातील भक्तगण व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. अवतार दिनानिमित्त मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला. संत-महंतांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले होते. श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने जालना शहरातील महानुभाव पंथाच्या धार्मिक व सांस्कृतिक परंपरेला आणखी एक नवी जोड मिळाली. वनदेव मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या भूमिपूजनाने मंदिर परिसराच्या विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले असून, आगामी काळात हे प्रवेशद्वार भाविकांचे स्वागत करणारे आकर्षक प्रवेशद्वार म्हणून उभे राहणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यामुळे महानुभाव पंथीय भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

## श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त अभिवादन

जालना : महानुभाव पंथाचे संस्थापक व मानवतेचा संदेश देणारे श्री चक्रधर स्वामी यांच्या अवतार दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात नायब तहसिलदार सुनिता वैष्णव यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसिलदार एस. आर. तायडे, सहायक सहकार अधिकारी पी. आर. मोताळे, सहायक महसुल अधिकारी रविंद्र मगरे, आर. आर. हेलगट, एस. जी. कुलकर्णी, अतुल केदार तसेच एस. ओ. खांडेभराड, एस.एस. भोकरे, सुनिल काळुंके आदी कर्मचारी उपस्थित होते.

## पावसाने दगा दिला; पारेगाव तांडा येथील शेतकऱ्याने ३ एकर सोयाबीन उपटून फेकले! सुकलेल्या पिकात सोडल्या शेळ्या-बैल; जालन्यात बळीराजाची व्यथा पुन्हा ऐरणीवर

आज दिनांक १२ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना : गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसमोर पुन्हा एकदा गंभीर संकट उभे राहिले आहे. ऐन वाढीच्या काळात पावसाने पाठ फिरवल्याने सोयाबीन आणि कपाशीची पिके सुकून वाळू लागली आहेत. पिके हातातून गेल्याचे स्पष्ट झाल्याने पारेगाव तांडा येथील शेतकरी रमेश सिताराम जाधव यांनी आपल्या तीन एकर शेतातील उभे सोयाबीन पीक उपटून फेकून दिले. एवढेच नव्हे, तर सुकलेल्या पिकांमध्ये शेळ्या आणि बैल चरण्यासाठी सोडून दिल्याचे हृदयद्रावक चित्र समोर आले आहे. यंदा पावसाच्या अनिश्चिततेचा मोठा फटका खरीप पिकांना बसत आहे. सुरुवातीला पेरणी झाल्यानंतर पिकांची वाढ चांगली होईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना होती. मात्र, गेल्या महिनाभरापासून पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील ओलावा कमी झाला आणि उभ्या पिकांनी माना टाकण्यास सुरुवात केली. सोयाबीनचे पीक अक्षरशः वाळून गेल्याने त्यातून उत्पादन मिळण्याची शक्यता मावळली आहे. रमेश जाधव यांनी मोठ्या कष्टाने आणि खर्च करून तीन एकरांत सोयाबीनची लागवड केली होती. मात्र, पावसाअभावी संपूर्ण पीक हातचे गेल्याने लागवडीचा खर्चही निघणार नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अखेर त्यांनी स्वतःच उभे पीक उपटून फेकण्याचा निर्णय घेतला. शेतातील सुकलेले सोयाबीन जनावरांच्या चरण्यासाठी सोडून देण्याची वेळ त्यांच्यावर आली. पिके वाळली, खर्च बुडाला आणि उत्पन्नाची आशा मावळली, अशा तिहेरी संकटात परिसरातील शेतकरी सापडले आहेत. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे आणखी किती क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे, याचा तातडीने प्रशासनाने आढावा घेण्याची गरज निर्माण झाली आहे. दरम्यान, प्रशासनाने संबंधित भागातील वाळलेल्या व नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, तसेच बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार आर्थिक मदत व पीक नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे. बळीराजाच्या डोळ्यांसमोर उभे पीक वाळत असताना प्रशासन आता तरी जागे होणार का? असा सवालही या घटनेमुळे उपस्थित होत आहे.

## रूख्मणबाई देवीदास बोराडे यांचे निधन



जालना : बदनापूर तालुक्यातील हिवरा दाभाडी येथील प्रतिष्ठीत नागरीक देवीदास बोराडे यांच्या पत्नी श्रीमती रूख्मणबाई देवीदास बोराडे (वय ६७) यांचे गुरूवार १० सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती देवीदास, मुले बाबासाहेब, शिवाजी, राजु, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हिवरा दाभाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, गावातील नागरीकांसह पंचक्रोषीतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गंगुबाई रंगनाथ टेकाळे यांचे निधन



जालना : बदनापूर तालुक्यातील हिवरा दाभाडी येथील प्रतिष्ठीत नागरीक श्रीमती गंगुबाई रंगनाथ टेकाळे (वय १०३) यांचे शनिवार १२ सप्टेंबर रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात अवचितराव, गुलाबराव, प्रभाकर ही तीन मुले, हौसाबाई ही मुलगी, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर हिवरा दाभाडी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, गावातील नागरीकांसह पंचक्रोषीतील लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुढील दोन वर्षांत जालना जिल्ह्यातील पाचशे जिल्हा परिषद शाळांचा दर्जेदार विकास करा : आढावा बैठकीत पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे निर्देश

मुंबई, दि. १३- जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांचा दर्जा उंचावून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून करून देण्यासाठी सर्वसमावेश आराखडा तयार करावा. पुढील दोन वर्षांत जिल्ह्यातील पाचशे शाळांचा दर्जे दार विकास करण्याचे नियोजन करावे, असे निर्देश राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज दिले. नवीन वर्षात नवी शाळा' या संकल्पनेसह राज्याने आदर्श घ्यावा असे काम करा अशा सूचनाही त्यांनी दिल्या. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत जालना जिल्हा परिषद शाळांच्या विकासकामांचा





पुन्हा एकदा आढावा घेतला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, मनपा आयुक्त अंजली शर्मा यांच्यासह विविध अधिकारी दृरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यापूर्वीही १ सप्टेंबर रोजीच्या बैठकीत पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा परिषद शाळांचा आढावा घेऊन सूचना केल्या होत्या. त्यावेळी त्यांनी शाळांचा सर्वे करून अहवाल देण्याचे निर्दे श दिले होते. आज त्यावर चर्चा करून त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. शाळांचा निधी जागरूकतेने खर्च करा शाळा आणि अंगणवाड्यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून उपलब्ध होणारा निधी नियोजनबद्ध, काटेकोर आणि परिणामकारक पद्धतीने खर्च करावा. शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक शैक्षणिक सुविधा निर्माण करण्याबरोबरच विकासकामांचा दर्जाही उत्तम राखावा. जिल्ह्यातील शाळांचा विकास करताना आदर्श शाळेची संकल्पना डोळ्यासमोर ठेवावी. शाळांची आकर्षक रंगरंगोटी, उत्तम परिसर, आवश्यक पायाभूत सुविधा आणि दर्जे दार कामांवर भर द्यावा. जालना जिल्ह्यात विकसित होणाऱ्या या आदर्श शाळांचे अनुकरण राज्यातील तसेच इतर राज्यांतील शाळांनी करावे, अशा गुणवत्तेचे काम झाले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. नवीन वर्षात नवी शाळा 'नवीन वर्षात नवी शाळा' ही संकल्पना घेऊन संबंधित यंत्रणांनी अभियान स्वरूपात काम करावे. शाळांच्या विकासकामांबाबत पुढील आढावा बैठक आपण स्वतः जालना येथे घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण योजनांतर्गत सुरू असलेल्या विविध कामांचाही आढावा घेतला. या योजनांसाठी उपलब्ध निधी निर्धारित वेळेत खर्च करावा. मंजूर कामांना कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही, याची दक्षता घेऊन ती गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.